F.Y.B.A 24/11/17 2 to 6 Pages 2 LIBRARY MAR I Sem I MAR-I SEM-I (62)

Q.P. Code :25756

[Time:3Hours] [ Marks:100]

**Please check whether you have got the right question paper.**

सूचनाः **1.** सर्व प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

**2.** उजवीकडील अंक **पूर्ण गुण** दर्शवितात.

प्र१. अ) ‘नाटक’ या साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून ‘नाटक’ ही एक संमिश्र कला कशी आहे, चर्चा करा. २०

**किंवा**

आ) ‘नाटक’ या साहित्यप्रकाराच्या काही व्याख्या विशद करून ‘शोकात्मिका’ या नाटयप्रकाराची सविस्तर माहिती लिहा.

प्र२. अ) विजय तेंडुलकर लिखित ‘कावळ्यांची शाळा’ या नाटकातून कोणकोणती आशयसूत्रे स्पष्ट होतात ते सविस्तर उलगडून दाखवा. २०

**किंवा**

आ) ‘कावळ्यांची शाळा’ या विजय तेंडुलकरांच्या नाटकात व्यक्तिचित्रण व प्रसंगातून विनोदनिमिर्ती कशी साधली आहे ते साधार स्पष्ट करा.

प्र३. अ) फाळणीच्या पार्श्वभूमीवर अस्वस्थता आणि मानवी भावभावनांचे विश्व ‘राहिले दूर घर माझे’ या शफाअत खान लिखित नाटकात कसे उभे राहते याचा वेध घ्या. २०

**किंवा**

आ) एक हिंदू स्त्री आणि मुस्लीम कुटुंब यांच्यातील नात्याचे हळुवार बंध ‘राहिले दूर घर माझे’ या नाटकात शफाअत खान यांनी कसे चित्रित केले आहेत याचा परामर्श घ्या.

प्र४. टिपा लिहा **(प्रत्येक गटातील एक).**

अ) ‘सुखात्मिका’: एक नाटयप्रकार १०

**किंवा**

नाटकाचा ‘पात्र’ हा मूलघटक

आ) ‘कावळ्यांची शाळा’ या नाटकातील ‘बिगुलवाले मामा’ १०

**किंवा**

‘कावळ्यांची शाळा’ या नाटकाचा शेवट



932EBF463941929CE437393033E3B271

इ) ‘राहिले दूर घर माझे’ या नाटकाचे भाषिक विशेष १०

**किंवा**

‘राहिले दूर घर माझे’ या नाटकातील ‘तन्नो’ च्या व्यक्तिमत्त्वात होत गेलेले बदल

प्र५. पुढीलपैकी कोणत्याही **पाच प्रश्नांची पूर्ण वाक्यात** उत्तरे लिहा. १०

१) शकूच्या मामांचे पूर्ण नाव काय?

२) मंगेश बाळयाचे रेल्वे स्थानकावर कशा पद्धतीने स्वागत करायचे ठरवतो?

३) बाळ्या मंगेशकडे कोणत्या परीक्षेच्या तयारीकरिता येतो?

४) तोफखाने मास्तर चुकून काय गिळतात?

५) कासीमचा मूळ गावी कोणता व्यवसाय असतो?

६) हमीदाला कोकणातल्या कोणत्या पदार्थांची आठवण येते?

७) ‘राहिले दूर घर माझे’ या नाटकातील घटना कोणत्या दोन स्थळी घडतात?

८) नासीरचा भारतातील मूळ प्रांत कोणता?



932EBF463941929CE437393033E3B271